सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३
E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७
Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३

महत्वाचे/कालमर्यादित.

क्रमांक विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१५/ ९८८
दिनांक :- २८/४/२०१५

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व खाजगी विनाअनुदानित,
अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र पदविका/पदवी संस्था.
तसेच एमबीए/एमसीए पदव्युत्तर पदवी संस्था.

विषय :- **खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थेमध्ये व्यावसायीक अभ्यासक्रमास सन २०१४-१५ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के प्रतिपुर्तीबाबत.**

संदर्भ :- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- १५/अर्थसं/ईबीसी/वाटप/२०१५/०८ अ दिनांक २३ एप्रिल २०१५.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, सन २०१४-१५ मधील ईबीसी शिष्यवृत्तीची रक्कम सबंधित पात्र विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे. तसेच त्यांचे वाटप करतांना गुणवत्ता व मेरीट (Merit) मानक (Standard) निश्चीत करुनच वाटप करावयाचे आहे. व याच अटीच्या अधिन राहुन तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचेकडुन अनुदान उपलब्ध होणार आहे.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील व्यावसायीक अभ्यासक्रमास सन २०१४-१५ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया पात्र मागास विद्यार्थ्यांचे मागिल वर्षातील विद्यापिठ/मंडळाच्या परीक्षेनुसार गुणपत्रिकेतील एकुण गुण (Total Aggregate Marks) विद्यार्थ्यास मिळालेले गुण (Total Marks Obtained) आणि टक्केवारी (Percentage) याबाबतची माहीती संस्थाप्रमुखांनी दिनांक १५ मे २०१५ पर्यंत संचालनालयाच्या dtemaharashtra.gov.in संकेतस्थळावर EBC Scholership प्रणालीमध्ये अद्यावत करावे तसेच संकेतस्थळावरुन अहवाल डाऊनलोड करुन त्याची प्रमाणित हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपीसह माहीती दिनांक १८ मे २०१५ पर्यंत या कार्यालयास सादर करावा. जेणेकरुन विद्यार्थ्याचे बँक खात्यात थेट शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्तीची रक्कम जमा करणे सुलभ होइल.

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना फी प्रतिपुर्तीची रक्कम शासनाने वरीलप्रमाणे नमुद कार्यपध्दतीनुसारच करण्यात येणार आहे, याबाबत संस्थाप्रमुखांनी नोंद घ्यावी.

S. P. Pasebard

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.

F:\backup kadam\all Manish letter 30.doc